# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १४०-२२ दिनांक :- १५/०५/२०२२

## धम्म सम्राट अशोक बुध्दविहार व मेडिटेशन सेंटर, रामदेव पार्क मिरारोड (पूर्व) या इमारतीच्या उद्‌घाटन कार्यक्रमासाठी वाहतूक नियंत्रण अधिसूचना.

---

मिरा-भाईंदर शहरातील नवघर पोलीस ठाणे हद्दीमध्ये येत असलेल्या रामदेव पार्क, मिरारोड पूर्व या ठिकाणी दिनांक १६/०५/२०२२ रोजी **धम्म सम्राट अशोक बुध्दविहार व मेडिटेशन सेंटर** इमारतीचा उद्‌घाटन सोहळा मिरा भाईंदर महानगरपालीके तर्फे आयोजित करण्यात आला आहे. सदर उद्‌घाटन सोहळयास मा. ना. श्री. एकनाथ शिंदे, नगरविकास व सार्वजनिक बांधकाम मंत्री (सा.उ.) महाराष्ट्र राज्य, मा. देवेंद्र फडणविस, विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र राज्य, मा.श्री. रामदास आठवले, केंन्द्रीय सामाजिक न्याय तथा अधिकारीता राज्यमंत्री, भारत सरकार व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच सदर कार्यक्रमास अंदाजे चार ते पाच हजार नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर परिसरातील संपूर्ण रस्त्यावर नागरीकांची वर्दळ राहणार असुन वाहनांना येण्या-जाण्यास मोठया प्रमाणात अडथळा निर्माण होवु शकतो व अशातच वाहनांमुळे पादचा-यांचा किरकोळ अगर गंभीर अपघात होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे सदर परिसरातील रस्त्यांवर पादचा-यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने व वाहतूक कोंडी टाळण्याच्या दृष्टीने **१)** श्रीराम चौक ते मेडिटेशन सेंटर व **२)** मिनाताई ठाकरे मंडई ते श्रीराम चौक येथे रस्त्यावर बॅरीकेटींग करून अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळता इतर सर्व वाहनांना प्रवेश बंदी व पार्कीग करीता मनाई करण्यात आली आहे. कार्यक्रमाकरीता उपस्थित राहणा-या सुमारे चार ते पाच हजार नागरिकांमुळे मोठया प्रमाणात गर्दी होऊन निर्माण होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक नियोजन करण्यात आले आहे.

श्री.विजयकांत सागर, पोलीस उपायुक्त, (मुख्यालय) मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी पोलीस आयुक्तालयाच्या वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त म्हणून शहरातील रस्त्यांवर वाहतूक कोंडी होऊ नये व अपघात होऊ नये यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (१),(ब) प्रमाणे व मोटार वाहन कायदा कलम ११६ (१),(अ),(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे अधिसूचना जारी केली आहे.

दिनांक १६/०५/२०२२ रोजी सकाळी ०९.०० वा. ते २२.०० वा. दरम्यान नवघर पोलीस ठाणे हद्दीमधील खालील दोन ठिकाणी अत्यावश्यक सेवेतील वाहने (पोलीसांची वाहने, फायरब्रिगेडची वाहने, ॲम्बुलन्स इ.) वगळता तसेच वरील नमुद परिसरात राहणा-या रहिवाशांची वाहने वगळता इतर वाहनांना प्रवेशास व पार्कींग करीता मनाई करण्यात येत आहे.

**१.** प्रवेश बंद - श्रीराम चौक ते मेडिटेशन सेंटर, रामदेव पार्क मिरारोड येथे जाण्यासाठी वाहनांना **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग - १. रौनक फॅमिली रेस्टोरंट येथून डावे वळण घेऊन सालासार अर्पण बिल्डींग मार्गे इच्छित स्थळी जाण्यास मुभा आहे.

२. मिनाताई ठाकरे मंडई येथून उजवीकडे वळून इच्छित स्थळी जातील.

पार्कींगची व्यवस्था - १. श्रीराम चौक ते मेडिटेशन सेंटर, रामदेव पार्क मिरारोड पर्यंतच्या रोडवर वाहनांना **पार्कींग करीता बंदी** घालण्यात येत आहे.

२. कार्यक्रमास येणारे व स्थानिक रहिवासी हे विना ग्रुप, जानकी रिजेन्सी बिल्डींगच्या मागे वाहने **पार्क करतील.**

३. अरिहंत प्लाझा व ओत्सवाल एव्हेन्यू येथील रहिवासी यांची वाहने डिवाईन मर्सी चर्च समोर **सिंगलला पार्क** करतील.

**२.** प्रवेश बंद - विना ग्रुप जानकी रिजेन्सी या ठिकाणावरुन श्रीराम चौकाकडे जाण्यास प्रवेश सर्व वाहनांना प्रवेश बंद.

पर्यायी मार्ग - १. मिनाताई ठाकरे मंडई मार्गे इच्छित स्थळी जातील.

२. सालासार अर्पण सोसायटी मार्गे इच्छित स्थळी जातील.

पार्कींगची व्यवस्था - कार्यक्रमास येणारे नागरिक विना ग्रुप, जानकी रिजेन्सी बिल्डींगच्या मागे वाहने **पार्क करतील.**

-------ooo------